क्र. मरारविम/०२/प्रशासन/ ५१५८
दि. १२.०८.२०२५

# महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित

म.रा.र.वि.म.
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

## परिपत्रक

**विषय : महामंडळातील अधिकाऱ्यांच्या रजेबाबत...**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने असे निदर्शनास आले आहे की, महामंडळातील अधिकाऱ्यांकडून परस्पर रजा घेतली जाते व त्याबाबत मा. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांची परवानगी घेतली जात नाही. तसेच, त्यांना सदर रजेबाबत कोणतीही कल्पना दिली जात नाही. मुंबई कार्यालयातील तसेच इतर शिबिर कार्यालयातील अधिकारी देखील याच पध्दतीने कोणतीही पूर्व परवानगी न घेता परस्पर रजा घेतात, असे निदर्शनास आले आहे.

सदरचे वर्तन हे प्रशासकीय शिस्तीचे भंग करणारे असून यामुळे अनेकदा अडचणी निर्माण होतात. काही वेळेला मा. मंत्री महोदयांच्या स्तरावर महत्वाच्या बैठका आयोजित केलेल्या असता त्यासाठी संबंधित अधिकारी उपलब्ध होत नाहीत व ते रजेवर आहेत ही बाब बैठकीच्या वेळेला समजते. त्यामुळे बैठकीत मा. मंत्री महोदयांच्या / अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या रोषाला सामोरे जावे लागते व कामकाजात देखील अडथळा निर्माण होतो.

वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून अशा प्रकारे नियमांना सोडूनचे वर्तन हे महामंडळाची प्रशासकीय घडी मोडणारे आहे. यास्तव, याची वरिष्ठ स्तरावर दखल घेण्यात आली असून या अनुषंगाने महामंडळातील सर्व अधिकाऱ्यांना सुचित करण्यात येते की, यापुढे कोणतीही रजा घेताना त्यास वरिष्ठांची लेखी पूर्व परवानगी असणे आवश्यक आहे. तसेच, काही अपरिहार्य / अचानक उद्भवणाऱ्या परिस्थितीत रजा घ्यावी लागल्यास, संबंधित अधिकाऱ्यांनी त्याबाबत त्यांच्या वरिष्ठांना तसेच मा. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना व्यक्तिश: कळवावे.

वरीलप्रमाणे रजेबाबत कार्यवाही न केल्यास संबंधित अधिकाऱ्यांविरूध्द प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. तसेच, वर नमूद केलेली रजेबाबतची कार्यपध्दती ही सर्व अधिकाऱ्यांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या इतर अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या निर्दशनास आणावी व याचे तंतोतंत पालन होईल, याची सर्वांनी खबरदारी घ्यावी.

सदर परिपत्रक मा. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

12/8/2025

**(रामदास खेडकर)**
**महाव्यवस्थापक (प्रशासन व वाणिज्य)**
**म.रा.र.वि.म. (मर्या.), मुंबई**

**प्रति,**

१. **सर्व विभाग प्रमुख / शिबिर कार्यालय प्रमुख / मुख्य अभियंते,**
म. रा. र. वि. म. (मर्या.), मुंबई तसेच सर्व शिबिर कार्यालये.
२. **सर्व अधिकारी / कर्मचारी,** म. रा. र. वि. म. (मर्या.), मुंबई तसेच सर्व शिबिर कार्यालये.

**प्रत माहितीस्तव :**

१. मा. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, म.रा.र.वि.म.(मर्या.), मुंबई.
२. मा. सह व्यवस्थापकीय संचालक (१ / २ / ३), म.रा.र.वि.म.(मर्या.), मुंबई.
३. सहा. व्यवस्थापक (मा.सं.), म.रा.र.वि.म.(मर्या.), मुंबई.
४. श्री. कवी शंकर ठाकूर, प्रणाली प्रशासक, म.रा.र.वि.म.(मर्या.), मुंबई.
   - यांनी सदर परिपत्रक महामंडळाच्या संकेतस्थळावर प्रशासन विभागांतर्गत अपलोड करावे.
५. निवड नस्ती.

**सीआयएन** : U45200MH1996SGC101586
**जीएसटी** : 27AACM6833C1ZP

**नोंदणीकृत कार्यालय** : नेपियन्सी रोड, प्रियदर्शनी पार्क जवळ, मुंबई - ४०० ०३६
**दूरध्वनी** : (०२२) २३६८ ५९०९
**दूरध्वनी** : (०२२) २३६१ ३७८९
**दूरध्वनी** : (०२२) २३६९ १०३०

**कार्पोरेट कार्यालय** : वांद्रे रेक्लेमेशन डेपोसमोर, लिलावती हॉस्पिटलजवळ, के.सी.मार्ग, वांद्रे (प), मुंबई - ४०० ०५०
**दूरध्वनी** : (०२२) २६४० ०१९० / २०१
**दूरध्वनी** : (०२२) २६५५ ८१७५ / ७६
**फॅक्स** : (०२२) २६४१ ७८९३

www.msrdc.org

Scanned with OKEN Scanner